दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
• वर्ष १६ वे • अंक २०९ • MAHMAR/2006/17212 • रायगड • रविवार दि.२४ ऑक्टोबर २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## सिडकोविरोधात ठिय्या आंदोलन
# आ.प्रशांत ठाकूर यांनी झोपडपट्टी पाडकाम रोखले

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**नवीन पनवेल भीमनगर झोपडपट्टी पाडण्यासाठी मोठ्या पोलीस बंदोबस्तात आलेल्या सिडकोच्या अतिक्रमणविरोधी पथकाला भाजपचे उत्तर रायगडचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या ठिय्या आंदोलनामुळे कारवाई न करता माघारी जावे लागले. त्यामुळे तेथील रहिवाशांनी आमदार प्रशांत ठाकूर यांचे आभार मानले आहेत.**



नवीन पनवेल सेक्टर १ एस शबरी हॉटेलच्या बाजूला गेल्या १५ वर्षांपेक्षा जास्त काळ १०८ झोपड्या असलेली भीमनगर झोपडपट्टी आहे. येथील रहिवासी मोलमजुरी करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत असतात. महिला आजूबाजूच्या सोसायटीत जाऊन घरकाम करतात. सिडकोचे अधिकारी शुक्रवारी ही झोपडपट्टी अनधिकृत असल्याचे सांगत कोणतीही नोटीस न देता ती पाडण्यासाठी पोलिसांचा फौजफाटा घेऊन आले. याबाबत आमदार प्रशांत ठाकूर यांना समजताच ते स्वतः त्या ठिकाणी येऊन सिडकोचे पथक परत जाईपर्यंत तेथे बसून राहिले होते. आमदार प्रशांत ठाकूर यांनी सिडकोच्या अतिक्रमणविरोधी विभागाचे सहाय्यक नियंत्रक दुबल यांना या झोपड्या पाडण्याला आमचा विरोध असल्याचे सांगून ते आपल्या सहकार्यांसह त्या ठिकाणी ठिय्या मारून बसले. या वेळी त्यांच्यासोबत स्थायी समिती सभापती संतोष शेट्टी, प्रभाग समिती 'ड' अध्यक्ष सुशीला घरत, नगरसेवक प्रकाश बिनेदार, नगरसेविका चारुशीला घरत, ॲड. वृषाली वाघमारे, राजेश्री वावेकर, ॲड. जितेंद्र वाघमारे, संतोष भोईर, शिवाजी भगत, आंग्रे, आर. जे. म्हात्रे, झोपडपट्टी संघाचे अध्यक्ष आनंद म्हसके होते. आमदारांनी या वेळी सिडकोच्या व्यवस्थापकीय संचालकाना फोन करून या लोकांनी येथून उठून कोठे जायचे याचा निर्णय प्रथम घ्या, मगच त्यांच्या झोपड्या पाडा, असे सांगितले. त्यामुळे सिडकोचे पथक कोणतीही कारवाई न करता तेथे बसून राहिले. अखेर संध्याकाळी ५.३० वाजता सिडकोचे पथक आणि पोलीस माघारी गेल्यावर स्थानिक झोपडपट्टीवासीयांनी आमदार प्रशांत ठाकूर यांचा जयघोष केला.

केंद्र आणि राज्य सरकारने बेघर असलेल्यांना स्वतःचे मालकीचे घर २०२२पर्यंत देण्यासंदर्भात योजना आखल्या आहेत. दुर्दैवाने भीमनगर झोपडपट्टी ही सिडकोच्या हद्दीत येत असून त्याबाबत सिडकोने कोणतीही योजना आखलेली नाही. येथील प्लॉट हा देण्यात आल्याने आज हे पथक झोपड्या पाडण्यासाठी येथे आलेले आहे. मी सिडकोच्या व्यवस्थापकीय संचालकाना याबाबत सिडकोने आपले धोरण लवकरात लवकर आखले पाहिजे, अशी विनंती केली आहे. यापूर्वी देवेंद्र फडणवीस यांचे सरकार असताना अशी कारवाई केली जात नव्हती. त्यानंतरच्या काळात सिडकोने धोरण ठरवले तर नाहीच, पण इतर महापालिका झोपडपट्टीवासीयांचे पुनर्वसन करीत असताना सिडको कारवाई करीत आहे. त्याला आमचा विरोध आहे. त्यासाठी आम्ही आलो आहोत, असे या वेळी माध्यमांशी बोलताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले. नगरसेविका ॲड. वृषाली वाघमारे म्हणाल्या की, भीमनगर झोपडपट्टी २००५ पासून येथे वसली आहे.

नगरपालिका असताना आणि आता महापालिकेने पंतप्रधान आवास योजनेत येथील सर्व्हे केला आहे, पण ही झोपडपट्टी सिडको वसाहतीत येत असल्याने सिडकोने तुम्ही आमच्या वसाहतीमधील झोपडपट्ट्यांचा सर्व्हे करू नका, त्यांचे पुनर्वसन करण्याची जबाबदारी आमची आहे, असे पत्र दिले आहे. आज कोणतीही सूचना न देता त्यांनी कारवाई करायला सुरुवात केली हे योग्य नाही.

# एनडीआरएफचे निकष बदलण्यासंदर्भात केंद्राची उदासीनता : खा.सुनील तटकरे



**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

नजीकच्या काळात कोकणात आलेल्या निसर्ग व तौक्ते चक्रीवादळ तसेच महाड येथे आलेल्या महापुराच्या नैसर्गिक आपत्तीनंतर जवळपास २ ते ३ महिन्यांच्या कालावधीनंतर केंद्रीय पथक पाहणी करण्यासाठी त्याठिकाणी आले. केंद्र सरकारने एनडीआरएफच्या निकषांमध्ये बदल करण्याची आवश्यकता असल्याबाबत आमची नेहमीच आग्रही मागणी राहिलेली आहे. त्याअनुषंगाने एनडीआरएफचे निकष बदलण्याच्या दृष्टिकोनातून काही दिवसांपूर्वी राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्यासह केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली होती. परंतु एनडीआरएफच्या निकषांच्या बाबतीत केंद्राकडून नुकतेच प्राप्त झालेल्या पत्रानुसार केंद्राने एनडीआरएफचे निकष बद्दलण्यासंदर्भात उदासीनता दाखवली असल्याचे प्रतिपादन खासदार सुनील तटकरे यांनी केले. ते श्रीवर्धन तालुक्यातील वडवली, बोर्ली पंचतन, भरडखोल याठिकाणी विविध विकासकामांच्या भूमिपूजन व उद्घाटन समारंभाच्या कार्यक्रमाप्रसंगी बोलत होते.

ते पुढे बोलताना म्हणाले की कोकणात आलेल्या नैसर्गिक आपत्तीनंतर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार, बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली राज्यातील महाविकास आघाडी सरकारने नुकसानग्रस्तांना नुकसानभरपाई म्हणून एनडीआरएफच्या निकषांच्या तिपटीने मदत सर्व आपद्ग्रस्तांना देऊन एकप्रकारे दिलासा दिला असल्याचे खा.सुनील तटकरे म्हणाले. त्याचप्रमाणे दिवे–आगर, भरडखोल, वेळास यासह संपूर्ण श्रीवर्धन परिसराला निसर्गाचा वरदहस्त लाभला असून इथल्या तरुणांना रोजगारासाठी मुंबई सारख्या ईतर शहरात जाण्याची वेळ येऊ नये, यासाठी विविध योजनांचा माध्यमातून याठिकाणी रोजगारनिर्मिती केली जाईल असे आश्वासनही खा.तटकरेंनी दिले. यावेळी राष्ट्रवादी श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष महंमद मेमन, तालुकाध्यक्ष दर्शन विचारे, उपाध्यक्ष तथा दिवेआगर सरपंच उदय बापट, मंदार तोडणकर, सुजित पाटील, नंदकुमार पाटील, तालुका युवक अध्यक्ष सिद्धेष कोसबे, सुचिन किर, उत्तम दिवेकर, बोर्लीचे सरपंच संतोष पयेर, संतोष गायकर, ज्योती परकर, प्रिया पाटील, मन्सूर गिरे, ऋषिकेश गोळे, रमेश घरत, रामचंद्र बुवा वाघे, सोपान काळपाटील, काळ्या महाराज चोगले यांच्यासह श्रीवर्धन तालुक्यातील राष्ट्रवादीचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते आदी उपस्थित होते.

आगामी निवडणुकीत मावळ व रायगड लोकसभा मतदारसंघात काँग्रेस दावा करणार असल्याचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत .../२

### श्रीवर्धनमधील भरडखोल गावाचा पाणी प्रश्न लवकरच सुटणार

रायगडच्या पालकमंत्री तथा श्रीवर्धनच्या आमदार आदिती तटकरे यांनी श्रीवर्धन तालुक्यातील भरडखोल गावासाठी पिण्याच्या पाण्याच्या योजनेला जवळपास ३ कोटी रुपयांची मंजुरी दिली आहे. परिसरातील कार्ले धरणात मुबलक प्रमाणात पाणी असून ते पाणी भरडखोल परिसरात आणून भरडखोल गावाला मुबलक प्रमाणात पाणी उपलब्ध करण्यासाठीचे नियोजन हे नव्याने प्रस्तावित केलेल्या योजनेत समाविष्ट आहे. अंदाजे डिसेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात या योजनेचा शुभारंभ करण्याबाबत नियोजन केले असून पुढील वर्षभरात या योजनेचे काम पूर्ण होऊन भरडखोल परिसरात मुबलक पिण्याचे पाणी उपलब्ध होईल अशी ग्वाही खा.सुनील तटकरे यांनी यावेळी दिली.

## संक्षिप्त...

### पुण्यात गांजाची शेती करणाऱ्यांना अटक

**दै.रायगड नगरी । पुणे**

पौडजवळील अंबरवेट परिसरात गांजाची शेती करणाऱ्या चौघांच्या मुसक्या अमली पदार्थ विरोधी पथकाने आवळल्या आहेत. आरोपींकडून गांजाची २५० झाडे, १८ किलो गांजा व इतर असा ११ लाख ६३ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. शहरात गांजा विक्री करणाऱ्यांना पकडल्यानंतर त्यांच्याकडून मिळालेल्या माहितीवरून ही कारवाई करण्यात आली.

चेतन मारूती मोहोळ (वय २७, रा. कानिफनाथ सोसायटी, कोथरूड), साहेबा हुल्लाप्पा म्हेत्रे (वय २०, रा. कोथरूड), प्रकाश वाघोजी खेडेकर (वय ३५) आणि इंदुबाई वाघोजी खेडेकर (वय ६५, रा. दोघेही– गवळीवाड़ा, अंबरवेट, पौड) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. अमली पदार्थ विरोधी पथकाने मोहोळ व म्हेत्रे याला शुक्रवारी कोथरूड पोलीस ठाण्याच्या हद्दीत संशयावरून गांजा विक्री करताना अटक केली होती. त्यांच्याकडून ५८० ग्रॅम गांजा मिळाला होता. याप्रकरणी कोथरूड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून त्यांच्याकडे चौकशी केली. त्यावेळी त्यांनी पौड परिसरातील अंबरवेट येथून गांजा आणल्याचं सांगितलं.

गुन्हे शाखेचे अतिरिक्त आयुक्त रामनाथ पोकळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विनायक गायकवाड आणि प्रकाश खांडेकर यांच्या पथकाने अंबरवेट येथे जाऊन प्रकाश खेडेकर याच्या घरी तहसीलदार यांच्या उपस्थितीमध्ये घराची झडती घेतली. त्यावेळी घरात १८ किलो ९९५ ग्रॅम ओलसर हिरवट, काळसर बोंडे, फांद्या आणि पाने मिळाली. या ठिकाणाहून खेडेकर दाम्पत्याला पकडून चौकशी केली. त्यावेळी घराजवळील जागेत गांजाची शेती केली असल्याचं आढळून आलं. त्या ठिकाणी पोलिसांना २५० तयार गांजाची झाडे आढळून आली आणि पोलिसांनी १५४ किलो गांजा जप्त केला.

# महाविद्यालयीन तरुणीच्या खात्यातून लांबवली स्कॉलरशिपची रक्कम

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अदलाबदल केलेल्या सिम कार्डचे व्हेरीफिकेशन करण्याच्या बहाण्याने एका सायबर चोरट्याने जीएम महाविद्यालयातील एका विद्यार्थीनीला मोबाईल फोनवर एनी डेस्क हे ॲप डाऊनलोड करण्यास सांगून त्याद्वारे तीच्या बँक खात्यात जमा असलेल्या स्कॉलर्शिपच्या रक्कमेसह सुमारे २ लाख रुपयांची रक्कम लांबवल्याची घटना उघडकिस आली आहे. या सायबर चोरट्या विरोधात कामोठे पोलिसांनी फसवणुकिसह आयटी ॲक्टनुसार गुन्हा दाखल करुन या प्रकरणाच्या तपासाला सुरुवात केली आहे.

या प्रकरणात फसवणुक झालेली २१ वर्षीय विद्यार्थीनी कामोठे येथील एमजीएम महाविद्यालयात बीडीएसचे शिक्षण घेत असून सध्या ती एमजीएमच्या गर्ल्स हॉस्टेलमध्ये रहाण्यास आहे. गत १९ ऑक्टोबर रोजी सदर विद्यार्थीनी रात्री ८. ३० वाजता आपल्या हॉस्टेलमध्ये असताना एका सायबर चोरट्याने बीएसएनएलमधुन जीओमध्ये अदलाबदल केलेल्या सीम कार्डचे व्हेरिफिकेशन करण्याच्या बहाण्याने संपर्क साधला. तसेच त्यासाठी ११ रुपयांचा बॅलेन्स टाकावा लागेल असे सांगून तिला मोबाईलमध्ये एनी डेस्क हे ॲफ्लीकेशन डाऊनलोड करण्यास सांगितले. त्यानुसार विद्यार्थीनीने एनी डेस्क हे ॲप डाऊनलोड केल्यानंतर सायबर चोरट्याने त्याचा पासवर्ड मागून घेऊन नेट बँकींगद्वारे ११ रुपयांचे रिचार्ज करण्यास सांगितले. त्यानुसार विद्यार्थीनीने रिचार्ज केल्यानंतर सायबर चोरट्याने तिला पोस्ट खात्याचे आयपीपीबी हे ॲफ्लिकेशन उघडण्यास तसेच तिला आधारकार्ड व एटीएमचे .../२

# मनोरंजन अनलॉक २.० ला पनवेलकरांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद

## कार्यक्रमाचे स्वागत तसेच आयोजकांचे रसिकांकडून मनःपूर्वक धन्यवाद





**दै.रायगड नगरी । पनवेल**

भारतीय जनता पार्टी सांस्कृतिक सेल उत्तर रायगड जिल्हातर्फे भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर व सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली पनवेलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या संगीत, नृत्य व नाटकांची मेजवानीने परिपूर्ण अशा मनोरंजन अनलॉक – २.० कार्यक्रमाला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने रंगभूमी अनलॉक झाल्याने नागरिकांनी कार्यक्रमाचे स्वागत तसेच आयोजकांचे मनःपूर्वक धन्यवाद मानले.

पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात शुक्रवारी (दि. २२) झालेल्या या कार्यक्रमास प्रमुख मान्यवर म्हणून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, सांस्कृतिक सेलचे प्रदेश अध्यक्ष, लातूर मनपाचे गटनेते शैलेश गोजमगुंडे, भाजपचे शहराध्यक्ष जयंत पगडे, पनवेल महानगरपालिकेचे सभागृहनेते परेश ठाकूर, नगरसेवक अनिल भगत, नगरसेविका दर्शना भोईर, रुचिता लोंढे, श्यामनाथ पुंडे, सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, भाजप शहर सरचिटणीस अमरीश मोकल, चिन्मय समेळ, सांस्कृतिक सेलचे शहर सहसंयोजक गणेश जगताप, संजीव कुलकर्णी, अमोल खेर, यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते. .../२

## विमानतळ पुनर्वसन क्षेत्रातील पॉकेट क्र. १ ते ७ मधील
# भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त न झालेल्या इमारतींना पाण्याची जोडणी देण्याचा सिडकोचा निर्णय

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

पाण्याची अत्यावश्यक गरज लक्षात घेता विमानतळ पुनर्वसन क्षेत्रातील (रिहॅबिलीटेशन न्ड् रिसेट्लमेन्ट – आर न्ड् आर) पॉकेट क्र. १ ते ७ मधील करंजाडे आणि उलवे येथील अद्याप भोगवटा प्रमाणपत्र (ऑक्युपेशन सर्टिफिकेट) प्राप्त न झालेल्या इमारतींना पाण्याची जोडणी देण्याचा निर्णय सिडकोतर्फे घेण्यात आला आहे. तसेच या जोडण्यांकरिता आकारण्यात येणारे पाण्याचे दर हे देखील अन्य प्राधिकरणे/स्थानिक शासन संस्थांपेक्षा कमी आहेत.

सिडकोतर्फे रायगड जिल्ह्याच्या पनवेल तालुक्यातील दहा गावांतील जमीन संपादन करून, ११६० हेक्टरवर नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प विकसित करण्यात येत आहे. सदर विमानतळ प्रकल्पबाधितांना राज्य शासनाने मंजूर केलेले सर्वोत्तम असे पुनर्वसन आणि पुन:स्थापन पॅकेज अदा करण्यात आले आहे. या पॅकेज अंतर्गत विमानतळा नजीकच्या क्षेत्रात पुष्पक नोड हे सर्व पायाभूत सोयी सुविधांनी युक्त असे पुनर्वसन आणि पुन:स्थापन क्षेत्र विकसित करण्यात येत असून प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसनाचे बहुतांशी काम पूर्ण झाले आहे.

या जोडण्यांकरिता आकारण्यात येणारे पाण्याचे दर हे देखील मुंबई महानगरपालिका, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, ठाणे महानगरपालिका, पुणे महानगरपालिका, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अंबरनाथ व पनवेल महानगरपालिका यांच्यापेक्षा कमी आहेत. .../२

विमानतळ प्रकल्पबाधितांना आवश्यक त्या सोयी सुविधा प्राधान्याने पुरविण्यास सिडको नेहमीच प्रयत्नशील आहे. आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पबाधितांनी सिडकोला नेहमीच सहकार्य केले आहे. याची जाण ठेऊन पुनर्वसन आणि पुन:स्थापना क्षेत्रातील पॉकेट क्र. १ ते ७ करंजाडे आणि उलवे येथील अद्याप भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त न झालेल्या इमारतींनाही पाण्याची जोडणी देण्याचा निर्णय सिडकोने घेतला आहे.

**डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

# वाढलेली काटेरी झुडपे बेतलीत नागरिकांच्या जीवावर

**दै.रायगड नगरी । गोवे–कोलाड**

मुंबई गोवा महामार्गाला जोडला गेलेला उप रस्ता म्हणजे खांब पालदाड रोहा मार्ग हा जिल्हा मार्ग असून या मार्गावर अनेक गावे वसलेली असून प्रवाशांसह नागरिकांची वाहतुकीची वर्दळ देखील मोठ्या प्रमाणात सुरू असते परंतु हा मार्ग शेतकऱ्यांच्या भातशेतीतून गेला असल्याने एकेरी मार्ग या मार्गलगत व कडेची साईडपट्यांवर पावसाळ्यात भयानक वाढलेली काटेरी झुडपे या झुडप्यांमुळे समोरील मोठं मोठी वळण अथवा येणारे वाहन दिसत नसल्यामुळे हा मार्ग आता चक्क नागरिकांच्या जीवावर वेतल्याने आपघातांचा मार्ग बनला असल्याचे चित्र दिसत आहे.



सदरच्या मार्गावर बाहे देवकान्हे धानकान्हे चिल्हे तळवली तर्फे अष्टमी नडवली खांब या गावांसह अन्य आदिवासी वाड्या देखील यामध्ये समाविष्ट असून या भागातील नागरिक तसेच शाळा कॉलेजेस मध्ये शिक्षण घेत असलेले विद्यार्थी त्याच बरोबर नजीकच्या धाटाव येथील औद्योगिक क्षेत्रात बहुसंख्येने ये जा करत असलेले कामगार वर्ग व सैदैव रहदारीच्या मार्गावरून रात्री अपरात्री प्रवास करित असतात परंतु भयानक ही वाढलेले काटेरी झुडपे त्यांना आपघातांचे कारण ठरवू शकतात असे चित्र निर्माण झाले आहे.

अत्यंत अरुंद व एकरिवमार्ग .../२

# ये सफर है अब मुश्कील...

एखादे मोठे वादळ येऊन गेल्यावर त्या परिसरात पडझडीचे, झालेल्या नुकसानीचे जे दृश्य दिसते त्यात आणि चित्रपट-नाट्यक्षेत्राच्या आजच्या स्थितीत फारसा फरक नाही. झालेली उलथापालथ विषण्णपणे पाहत, पुढील काळात काय काय करावे लागेल या विचाराने वादळग्रस्त जसा धास्तावलेला दिसतो, तशीच गत आज करोनामुळे मनोरंजन उद्योगाची झाली आहे. दीड वर्षानंतर, गुरुवारी नाट्यगृहांची व चित्रपटगृहांची दारे 'अर्धवट' उघडली असली, तरी त्या दारातून आधीचे भरभराटीचे दिवस 'आत येण्यास' अजून खूप अवकाश लागेल आणि ते सोपेही नाही. एकतर क्षमतेच्या केवळ पन्नास टक्के प्रेक्षकसंख्येला परवानगी असल्याने आर्थिक गणित जुळणार नाही आणि दुसरे म्हणजे, मधल्या दीड वर्षात खूप काही बदलले आहे. त्या बदलांचे परिणाम दूरगामी आहेत, त्यातील काही बदल कदाचित कायमस्वरूपीही असतील. एक प्रकारे, निर्बंध उठविल्यामुळे मनोरंजन उद्योगापुढील संकट संपले नसून, उलट या संकटाचे गांभीर्य किती आहे, ते आता पुढील काही महिन्यांत खऱ्या अर्थाने स्पष्ट होईल. चित्रपट, दूरचित्रवाणी आणि नाटक ही आजवर भारतीय मनोरंजन उद्योगातील तीन ता-लेवार घराणी होती. त्यातले व्यावसायिक नाटकाचे घराणे केवळ मुंबई-पुणे परिसरापुरते मर्यादित आहे. करोनाच्या आधीपासूनच आलेल्या 'ओटीटी' या 'नव्या घराण्याने' गेल्या दीड वर्षात वेगाने हातपाय पसरले असून; त्यामुळे आधीच्या तिन्ही घराण्यांसमोर सध्या मोठी प्रश्नचिन्हे उभी राहिली आहेत. त्या प्रश्नचिन्हांचे स्वरूप नेमके कसे आहे आणि किती गंभीर आहे, हा पुढील वाटचालीतील मोठा प्रश्न असेल. सन २०१९मध्ये चित्रपटसृष्टीची एकूण उलाढाल १९ हजार कोटी रुपयांची होती. ती सध्या ७२०० कोटींवर आली आहे. चित्रपटगृहांना तिकीट विक्रीतून मिळणारी रक्कम सहा हजार कोटी रुपये होती. ती सध्या दोन हजार कोटी एवढी खाली आली आहे. भारतात अजूनही एकपडदा थिएटरची संख्या मोठी आहे. एकूण नऊ हजार ५२७ पैकी सहा हजार ३२७ एकपडदा; उर्वरित तीन हजार २०० बहुपडदा आहेत. यात काम करणाऱ्या २५ हजार कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा-नोकऱ्यांचा प्रश्नही मोठा आहे. हे सगळे लक्षात घेतले, तर चित्रपटगीताच्याच भाषेत, 'कल चमन था, आज एक सहरा हुवा, देखतेही देखते ये क्या हुवा' अशी ही गत झाली आहे. मराठी नाट्यव्यवसायापुढील प्रश्नही तेवढेच गंभीर आहेत. गेल्या काही वर्षांत शनिवार-रविवार आणि सार्वजनिक सुट्टीचा दिवस वगळता, नाट्यगृहांबाहेर 'हाउसफुल'चा बोर्ड दुर्मीळ झाला होताच. त्यात आता पन्नास टक्क्यांना 'हाउसफुल' म्हणायचे, तर मग व्यवसाय कसा करायचा, हा गहन प्रश्न आहे. करोनाच्या तिसऱ्या लाटेचे संकट टळले आहे असे वाटत असतानाच, मनोरंजन उद्योगापुढे मात्र हे सगळे प्रश्न आता फणा काढून उभे राहतील. एखादे नवे माध्यम आले, की आधी सवयीच्या असलेल्या माध्यमाचे काय होणार असे विचारले जाते आणि कालांतराने नवे व जुने दोघेही आपापली जागा राखतात किंवा नवी जागा तयार करतात. या प्रक्रियेतही थोडी पडझड होतेच. अर्थात, त्याचे काही फायदेही आहेत. घरबसल्या मनोरंजन आणि तेही जागतिक दर्जाचे, ही सोय 'ओटीटी'ने केली. चित्रपटदेखील थिएटरऐवजी 'वैयक्तिक चित्रपटगृहात' म्हणजे मोबाइलवर पाहण्याची सवय झाली आहे. त्यातही काही दाक्षिणात्य चित्रपटांनी भाषांची मर्यादा ओलांडून प्रेक्षक खेचून घेतला; त्यामुळे तीही वेगळी स्पर्धा आहे. असे असले, तरीही मोठ्या पडद्याची भुरळ कायम राहणार आहे. त्यासाठी प्रेक्षकांना खेचून घेण्याएवढा उत्तम दर्जा, आशयातील नावीन्य आणि दृश्यात्मक श्रीमंती यांची कास यापुढे चित्रपटांना धरावी लागेल. 'ओटीटी'वर चित्रपट पाहताना गाणी अडथळा ठरतात. मोठ्या पडद्याला याचा फायदा घेऊन, पुन्हा एकदा 'संगीतमय' मनोरंजनाकडे कदाचित वळता येईल. केवळ मोठ्या पडद्यावरच पाहण्याची मजा येईल, असे चित्रपट तयार करणे हाही एक मार्ग असेल. मधल्या काळात कौटुंबिक कथानके टीव्हीवर आणि इतर सगळे वैविध्य 'ओटीटी'वर अशी जणू विभागणीच झाली. 'ओटीटीं'ची संख्या वाढून स्पर्धा निर्माण होईल, तेव्हा यात काय बदल होतील ते आताच सांगणे कठीण आहे. चित्रपटांचे स्ट्रीमिंग करून नवा चित्रपट थेट प्रेक्षकांच्या घरातच प्रदर्शित करण्याचा प्रयोग 'राधे' या हिंदी चित्रपटाने केला; परंतु चित्रपटाचे बजेट मोठे असेल, तर हे गणित फार यशस्वी ठरत नाही, असे लक्षात आले. तुलनेने मराठीत 'जून' या चित्रपटाच्या प्रदर्शनाचा प्रयोग कमी बजेटमुळे बऱ्यापैकी यशस्वी झाला, असे सांगतात. हे लक्षात घेऊन, यापुढे असे प्रयोग वाढतील. मल्टीप्लेक्स, मॉलमधील खरेदी; तसेच कौटुंबिक भटकंती या गोष्टी एकत्र जोडूनच जन्माला घातल्या गेल्या आहेत. काही दिवसांनी कदाचित पुन्हा सगळे आधीसारखे होईलही; मात्र तो मार्ग सोपा नाही, याची खूणगाठ मनोरंजन उद्योगाने बांधली पाहिजे.

# ओ एल एक्सवर ऑनलाईन बेड खरेदी करणे पडले महागात ; १ लाख ९५ हजारांची फसवणूक

**दै.रायगड नगरी । उरण**

ओएलएक्स या ऑनलाईन शॉपिंग एपवर बेड खरेदी करणे एका व्यक्तीला चांगलेच महाग पडले. ऑनलाईन शॉपिंग खरेदीमुळे या व्यक्तीला तब्बल १ लाख ९५ हजारांना लुबाडण्यात आले आहे. सुभोदिप बलराम बॅनर्जी असे फसवणूक झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. या बाबत न्हावाशेवा पोलिस ठाण्यात विकास कुमार या व्यक्ती विरोधात फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सुभोदिप याला एक बेड खर-ेदी करायचा होता. त्यासाठी त्यांनी ओएलएक्स या ऑनलाईन शॉपिंग एप वरून ५ हजार ५०१ रूपयांना बेड खरेदी केला.मात्र घरी डिलव्हरी आल्यानंतर हा बेड खराब असल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांने हा बेड परत केला. आणि त्यांनी भरलेले पैसे परत मागितले. त्यावेळी विकास कुमार नामक या व्यक्तीने तुमचे पैसे तुमच्या खात्यात जमा होतील असे सांगून त्यांच्याकडून बँक खात्याची डिटेल्स मागवून घेतली. त्यानंतर सुभोदिप बॅनर्जी यांच्या एचडीएफसी बँक खात्यातून ९० हजार ५०३ रूपये काढून घेतले.

या बाबत त्यांनी विकास कुमार याच्याकडे विचारणा केल्या नंतर त्याने तुमच्या खात्यात जमा होत नसल्यामुळे दुसरे बँक खात्याची बँक डिटेल्स काढून घेतली. त्यानंतर त्याने आयसीआयसीआय या दुसऱ्या बँक खात्याची डिटेल्स दिल्यानंतर त्या खात्यातून देखिल ९९ हजार ६९९ रूपये काढून घेतले.

दोन्ही खात्यातून पैसे काढल्यानंतर विकासकुमार यांनी आपला मोबाईल बंद केला. त्यामुळे बॅनर्जी याला आपली फसवणूक झाली असल्याची जाणीव झाल्यानंतर त्यानी या बाबत न्हावाशेवा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली असून न्हावाशेवा पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरिक्षक मधुकर भटे यांचर पोलिस पथक या प्रकरणी अधिक तपास करित आहेत.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## एनडीआरएफचे निकष बदलण्यासंदर्भात केंद्राची उदासीनता : खा.सुनील तटकरे

एका काँग्रेसच्या बैठकीत म्हणाले होते. यावर खा.सुनील तटकरे प्रतिक्रिया व्यक्त करताना म्हणाले की, निवडणुकीत कोणी काय हट्ट धरावा याबाबत बोलू इच्छित नाही. परंतु कदाचित सोनिया गांधींनी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांना काही वेगळे अधिकार दिले असले किंवा दिल्लीहून त्यांना काही याबाबत आदेश मिळाले असतील तर त्यांचं त्यांना माहीत. परंतु महाराष्ट्रातच नव्हे तर देशात युपीए मजबूत करण्याची व राज्यात महाविकासआघाडी अधिक बळकटीने कशी उभी राहील यादृष्टीकोनातून प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे जे काही नसेल त्याबाबतीत वल्गना न करता राज्यात आघाडी सरकार उत्तम पद्धतीने काम करत असून निवडणुका येतील त्यावेळेस याबाबतीत विचार केला जाईल. त्यामुळे जनतेच्या हिताचे प्रश्न कसे सोडवता हे पाहणे जास्त गरजेचे आहे असा खोचक टोलाही खा.तटकरे यांनी लगावला.

यासंदर्भात राज्यस्तरीय व केंद्रस्तरीय वरिष्ठ नेतृत्वांनी वेगवेगळ्या पद्धतीने आपली भूमिका यापूर्वी मांडलेली असून राज्यातील महाविकास आघाडीतील घटकपक्षांच्या नेतृत्वांनी देखील ठामपणे आपली मते मांडली आहेत. त्यामुळे या विषयावर याहुन अधिक काहीही मत मांडू इच्छित नसल्याचे म्हणत खा.सुनील तटकरे यांनी ईडीच्या छाप्यांविषयी प्रतिक्रिया देण्यास नकार दिला.

## महाविद्यालयीन तरुणीच्या खात्यातून लांबवली स्कॉलरशिपची रक्कम

फोटो काढण्यास सांगून त्याच्या माध्यमातून त्याने सदर विद्यार्थीनीच्या एसबीआयच्या बचत खात्यातील जमा रक्कम तसेच पोस्टच्या खात्यातील स्कॉलर्शिपची अशी एकूण २ लाख ३४२२ रुपये दुसऱ्या खात्यात वळती करुन घेतली. याबाबत विद्यार्थीनीच्या मोबाईलवर मेसेज आल्यानंतर तीने सायबर चोरट्यांकडे विचारणा केली असता, त्याने थोड्या वेळात पैसे परत मिळतील असे सांगून टाळाटाळ केली. त्यानंतर सायबर चोरट्यांकडून आपली फसवणुक झाल्याचे विद्यार्थीनीच्या लक्षात आल्यानंतर तिने कामोठे पोलीस ठाण्यात जाऊन पार दाखल केली.

## मनोरंजन अनलॉक २.० ला पनवेलकरांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद

कोरोना विषाणुमुळे उद्भवलेल्या संसर्जन्य रोगाचा प्रबंध व नियंत्रण उपाय म्हणून पनवेल महानगरपालिका क्षेत्र तसेच संपूर्ण राज्यात खबरदारीचा उपाय म्हणून नाट्यगृह संपूर्णपणे बंद ठेवण्यात आले होते. परंतु नुकतेच काढलेल्या परिपत्रकामध्ये २२ ऑक्टोबर २०२१ पासून नाट्यगृह सुरु करण्यात यावे असे जाहीर करण्यात आले. त्या पार्श्वभूमीवर आमदार प्रशांत ठाकूर व सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टी सांस्कृतिक सेल उत्तर रायगड जिल्ह्याच्यावतीने मनोरंजन अनलॉक - २.० - संगीत, नृत्य व नाटकांची मेजवानी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमामध्ये नृत्य आराधना कलानिकेतन ग्रुप, आदई आणि स्टार प्लस वरील डान्स प्लस ५ फेम पनवेलकर्स ग्रुप यांनी नृत्य सादर केली. तसेच सामगंध ग्रुप,पनवेल हे सुरेल गाण्यांची मैफिल यावेळी रंगली. त्यानंतर अटल करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेचे विजेते 'कलांश थिएटर, रत्नागिरी तर्फे 'बारस' हे धमाल विनोदी नाटक सादर झाले. या सर्व मनोरंजनात्मक कार्यक्रमाला रसिकांनी उदंड प्रतिसाद देत आयोजकांना या कार्यक्रमाच्या आयोजनाबद्दल धन्यवाद दिले.

## इमारतींना पाण्याची जोडणी देण्याचा सिडकोचा निर्णय

तरी ज्या सदनिकाधारकांची इमारत पूर्ण झालेली असून काही नियामक अडचणींमुळे भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करण्यास विलंब होत असल्यास सदनिकांधारकांनी पाण्याच्या नळजोडणीसाठी कार्यकारी अभियंता, चौथा मजला, रायगड भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४ येथे संपर्क साधावा, असे आवाहन सिडकोकडून करण्यात येत आहे.

## वाढलेली काटेरी झुडपे बेतलीत नागरिकांच्या जीवावर

त्यात भयानक जागोजागी एस आकाराची वळणं आणि मोठं मोठी वाढलेली काटेरी झुडपे त्यातच काही मोठं मोठं खड्डे त्यामुळे परतीचा होत असलेला पाऊस व धुक्का त्यामुळे दुचाकीस्वार, रिक्षा, व टेम्पो चालकाला वाहन चालविताना पुढील व वळण अथवा प्रवासी हा या वाढलेल्या काटेरी झुडपांमुळे दिसत नसल्याने मोठा आपघात होण्याची शक्यता या ठिकाणी वर्तवली जात आहे.

गणपती उत्सव व नवरात्री उत्सव देखील गेला तरी देखील या जुडपांची कोणी दखल घेतली नाही या मार्गाला वाली कोणी आहे की नाही असा संतप्त सवाल सर्वत्र व्यक्त केला जात आहे. कोरोना काळानंतर आता शाळा कॉलेजेस देखील सुरू झाले आहेत त्यामुळे ये जा करणाऱ्या विद्यार्थी वर्गाची देखील संख्या जास्त आहे. तसेच शेतकरी वर्गाची खरीप हंगामातील भात कापणी व झोडणी सुरू झाली असून त्यांची देखील लगबग बैल गाडीसह या मार्गावरून सुरू झाली आहे मात्र अरुंद रस्त्यामुळे व काटेरी वाढलेली झुडपे ही कोणाच्या ना कोणाच्या जीवावर वेतू शकतात आणि मोठा अपघाताचा धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# पोलिस स्मृती दिनानिमित्त माणगांवात मॅरेथॉनला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**



पोलिस स्मृती दिनानिमित्त रायगडचे पोलिस अधिक्षक अशोक दूधे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध कार्यक्रम घेण्यात येत आहेत. याचाच एक भाग म्हणून माणगांव पोलिस ठाण्या तर्फे मिनी मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. पुरुष गटासाठी १० किलोमीटर तर महिला गटासाठी ३ किलोमीटर लांबीचा पल्ला ठेवण्यात आला होता. १०० हून अधिक स्पर्धकांनी यात सहभाग नोंदवला. माणगांव पोलिस निरीक्षक अश्वनाथ बप्पाजी खेडकर यांनी यावेळी स्पर्धकांचा उत्साह वाढवला आणि हिरवा झेंडा दाखवून स्पर्धेचा शुभारंभ केला.

यावेळी पुरुष गटात दोन गट करण्यात आले होते, त्यातील पहिल्या गटात सुमित सुभाष मोरे प्रथम क्रमांक, राज रविंद्र खोत द्वितीय क्रमांक, प्रणय प्रमोद गांगावले तृतीय क्रमांक मिळविण्यात यशस्वी झाले. तर दुसऱ्या गटात सुदर्शन सरगडे, प्रज्योत गायकवाड, अमोल चव्हाण यांनी अनुक्रमे प्रथम द्वितीय आणि तृतीय क्रमांक मिळविला. महिलांचे देखील दोन गट करण्यात आले होते. त्यातील पहिल्या गटात वैष्णवी विनायक कुळे प्रथम क्रमांक, प्रेरणा प्रभाकर आरकर द्वितीय क्रमांक तर प्रचिती रत्नाकर निगुडकर ही तृतीय क्रमांक मिळविण्यात यशस्वी झाली तर दुसऱ्या गटात रोशनी भूपेश आखाडे, तेजल गणेश तेटगुरे, सेजल विश्वास टेंभे यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक मिळविला.

स्पर्धकांच्या जोरदार प्रतिसादात ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी पोलीस उपनिरीक्षक समद बेग, पोलीस हवालदार कुवेसकर, पोलीस कॉन्स्टेबल शाम शिंदे, रामनाथ डोईफोडे, गीते, ढाकणे, कराळे, महिला पोलीस कॉन्स्टेबल वझरकर, मोरे यांनी विशेष मेहनत घेतली.

# तळा तालुका कृषी विभागाच्या वतीने महिला किसान दिन संपन्न



**दै.रायगड नगरी । तळा**

तालुक्यातील गिरणे गावी येथे महाराष्ट्र शासन कृषी विभागयांच्या वतीने२२ऑक्टोबर महिला किसान दिनाचे आयोजन करण्यात आले होते महिलांचे सामाजिक, आर्थिक,राजकीय तसेच कृषी क्षेत्रात विशेष योगदान आहे. कृषी क्षेत्राचा विचार करता पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करत असून कुटुंबाचा आर्थिक दर्जा उंचावन्या चा प्रयत्न करत आहे.

कृषी विभागा मार्फत त्याच्या कष्टाला योग्य मोबदला मिळावा, तांत्रिकदृष्ट्या सक्षम व्हावे कमी खर्च जास्त उत्पादन व बचत गटाच्या माध्यमातून त्यांच्या उत्पादनांना योग्य बाजारपेठ मिळावी या साठी आज महिला किसान दिनाचे आयोजन करण्यात आले होते. महिला बचत गटांचे सक्षमीकरणा साठी कृषी व कृषी आधारित लघु उद्योगांना चालना देणे हे काळाची गरज आहे याउद्देशाने प्रधानमंत्री सूक्ष्मअन्न व प्रकिया योजना कृषी विभागामार्फत राज्यांत राबवली जात आहे.

तळा तालुकाचा विचार करता तृणधान्य, कडधान्य, मत्स्य उत्पादन व फळबागा या क्षेत्रा मध्ये विशेष संधी आहे तरी शेतकरी तसेच महिला बचत गट यांनी पुढे येऊन सदर योजनेचा लाभ घ्यावा असे आव्हान श्री एस आर म्हात्रे, कृषी अधिकारी, तळा यांनी केले. महिला बचत गट स्थापन करणे, लहान उद्यो-गाचे विस्तारीकरण, आधुनिकरण आणि स्तरवृद्धिकरण करून प्रक्रिया उदोगाची गुणवत्ता वाढून उत्पादन खर्च कमी केला पाहिजतरी कृषी विभाग स्वदेश फाउंडेशन यांच्या योजनांचा लाभ शेतकऱ्यांनी घेतला पाहिजे असे मार्गदर्शन सतीश भोसले,सहाय्यकव्यवस्थापक, स्वदेश लोणेरे यांनी केले.

सदर कार्यक्रमास सौ ज्योती पायगुडे सरपंच ग्रुप ग्रामपंचायत गिरणे, संतोष मोरे, स्वदेश फाउंडेशन, एस डी पुरी, सी बी पाडगे, पी बी कदम, ए यु बाबर, डी एम चांदोरकर, डी एन दुधाटे, श्री वाय जी कोळी(सर्व कृषी सहाय्यक) उपस्थित होते.

# बाजार भावापेक्षा स्वस्त गावठी (गावरान) भाज्यांची चलती ; सुधागडात गावठी भाज्या खरेदीसाठी झुंबड

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**



सुधागड तालुक्यात पावसाळ्यात व इतर हंगामात शेत मळे सजतात, यंदा ही भाजीपाला पीक मोठ्या प्रमाणात आलेय. परतीच्या पावसामुळे भाजीपाल्याचे नुकसान झाल्याने रायगड जिल्ह्यात पुणे व नवी मुंबई येथून मंडईतून येणाऱ्या भाजीपाल्याची आवक कमी झाली आहे. त्यामुळे भाज्यांच्या किंमती प्रचंड वधारल्या आहेत. मात्र जिल्ह्यासह सुधागड तालुक्यातील अनेक आदिवासी वाड्या पाड्यांवरील आदिवासी आपल्या परसात आणि डोंगर उतार व रान माळावर विविध गावठी भाज्यांची लागवड करतात. सध्या या गावठी भाज्यांचे भरघोस उत्पादन मिळत आहे. त्यामुळे ग्राहकांना या गावठी भाज्यांचा स्वस्त व आरोग्यवर्धक पर्याय उपलब्ध आहे. आदिवासींबरोबर काही शेतकरी देखील या भाज्यांची लागवड करतात. सध्या बाजारात शिराळे, घोसाळे, कार्ली, माठ, वांगी, भेंडी, काकडी, दूधी, गवार, ठाकरी मिरच्या, टॉमेटो अशा गावठी भाज्या मुबलक प्रमाणात उपलब्ध आहेत. अवघे १० ते १५ रूपये जुडी, वाटा किंवा पाव किलो इतक्या स्वस्त दरात या भाज्या मिळतात. तसेच कोणत्याही रासायनिक खते किंवा किटकनाशकांचा वापर न करता सेंद्रिय खतावर तयार झालेल्या या भाज्यांना खुप मागणी असते. रोज पहाटे लवकर उठून डोक्यावर भाज्यांचे टोपली घेवून आदिवासी महिला बाजारात येतात. यासाठी त्यांना खुप मेहनत आणि कष्ट घ्यावे लागतात. असे ताई वाघमारे या रानभाजी विक्रेत्या महिलेने सकाळला सांगितले.

गावठी भाज्यांचा हा हंगाम दिवाळी नंतर देखील सुरु असतो. त्यामुळे अनेक लोक पुण्या-मुंबई वरून येणाऱ्या भाज्यांवर अवलंबून राहत नाहीत. या आदिवासी महिला झेंडू आणि अस्टरची फुले देखील विक्रीसाठी आणतात.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खाली नमूद केलेली शेतजमीन मिळकत त्यांचे विद्यमान मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.**

| मौजे | सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| गिरवले ता.पनवेल | ९४/१ | ०-४०-२० पोटखराबा ०-०२-५० | ३.९४ |

सदर मिळकतीचे बाबतीत अथवा तिच्या कोणत्याही हिश्श्याचे बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्तखत, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अॅटॅचमेंट, लीन, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा वगैरे कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील पत्यावर प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी हरकती प्रत्यक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे, असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदी-विक्री व हस्तांतरणाचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : २४/१०/२०२१
पनवेल

**सही/-**
**अॅड.प्रगती दिनेश ठाकूर**
**नगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स,**
**ऑफिस क्र.२२, वासुदेव बळवंत**
**फडके नाट्यगृहाजवळ, पनवेल-रायगड**
**मो.नं.९१७२५६११११**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खाली नमूद केलेली शेतजमीन मिळकत त्यांचे विद्यमान मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.**

| मौजे | सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| सोमटणे ता.पनवेल | ९६/१ | ०-८५-०० पैकी ०-५३-०० क्षेत्रफळाकरिता | ८.५६ |

सदर मिळकतीचे बाबतीत अथवा तिच्या कोणत्याही हिश्श्याचे बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्तखत, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अॅटॅचमेंट, लीन, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा वगैरे कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील पत्यावर प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी हरकती प्रत्यक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे, असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदी-विक्री व हस्तांतरणाचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : २४/१०/२०२१
पनवेल

**सही/-**
**अॅड.प्रगती दिनेश ठाकूर**
**नगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स,**
**ऑफिस क्र.२२, वासुदेव बळवंत**
**फडके नाट्यगृहाजवळ, पनवेल-रायगड**
**मो.नं.९१७२५६११११**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## आदिवासींचे जातीचे दाखले काढण्याच्या मोहिमेस प्रारंभ

**दै.रायगड नगरी । उरण**

आचार्य विनोबा भावे आदिवासीवाडी, गागोदे ता पेण येथे कातकरी आदिवासी लोकांचे जातीचे दाखले काढण्याची मोहीम उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पेण यांच्या संयुक्त विद्यमाने आणि उरण सामाजिक संस्थेच्या माध्यमातून सुरू झाली. उरण सामाजिक संस्थेच्या माध्यमातून उरण तालुक्यातील एक हजाराहून जास्त आदिवासी बांधवांना जातीचे दाखले काढून दीले आहेत. सदर उल्लेखनीय काम पाहून उपविभागीय अधिकारी पेण विठ्ठल इनामदार, तहसिलदार स्वप्नाली डोईफोडे , एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी पेण श्रीमती आहेरराव यांनी पेण तालुक्यातील कातकरी आदिवासी लोकांचे जातीचे दाखले काढण्याची मोहीम युद्ध पातळीवर सुरू करण्याची परवानगी दिली. तसेच जे सहकार्य लागेल ते करण्याचे आश्वासन दिले.

सदर मोहीम आचार्य विनोबा भावे आदिवासी वाडी येथून सुरू झाली असून पुढील एक महिन्यात सर्व वाड्यावर उपक्रम घेतला जाईल आणि सर्व आदिवासी बांधवांना जातीचे दाखले काढून देण्यात येतील.आचार्य विनोबा भावे आदिवासीवाडी वरील कॅम्प मध्ये मंडळ अधिकारी मोकल,आदिवासी विकास निरीक्षक राजेंद्र भानुशाली, तलाठी स्वप्नगांधा पाटील,आदिवासी विकास सहाय्यक चव्हाण सर, वाडी वरील शाळेतले शिक्षक विष्णू म्हात्रे , जागृती पोवळे , वरसई आश्रम शाळेतील मुख्याध्यापक झनकर आणि त्यांचे सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सदर उपक्रमाचे आयोजन ड नितीन जेधे यांनी केले. उरण सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सुधाकर पाटील , चिटणीस संतोष पवार यांच्या मार्गदर्शनाखाली उपाध्यक्ष प्राध्यापक राजेंद्र मढवी, सामाजिक कार्यकर्ते नामदेव ठाकूर आणि रायगड भूषण दत्ता गोंधळी यांनी सदर उपक्रमाचे योग्य असे नियोजन केले.



# पनवेल तहसील कार्यालयाचे प्रत्यक्ष शासकीय कामकाज पाहण्यासाठी आदिवासींची भेट

## शासनाच्या विविध योजनांबाबत आदिवासी बांधवांना तहसीलदारांनी केले सविस्तर मार्गदर्शन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रायगड जिल्ह्यात आदिवासी समाज मोठ्या प्रमाणात असून बहुतेक परिसरातील आदिवासी समाज शैक्षणिकदृट्या मागासलेपणा, अशिक्षीत असल्याने आदिवासी लोकांना वेगवेगळ्या शासकीय कार्यालयांचे कामकाज कसे चालते हे समजण्यासाठी प्रत्यक्ष शासकीय कार्यालयास भेट देण्यासाठी तहसील कार्यालय व प्रेरणा चॅरीटेबल ट्रस्टच्या संयुक्त विद्यमाने आदिवासी बांधवांची भेट तहसील कार्यालय पनवेल येथे आयोजीत करण्यात आली होती.



सदर भेटीच्या दरम्यान आदिवासी बांधवांसाठी शासनाच्या वेगवेगळ्या विभागामार्फत राबविण्यात येणा–या योजना समजावून त्यासाठी प्रत्यक्ष अर्ज कसा करावा, सदर योजनेतून त्याना कोणता लाभ मिळणार आहे, तसेच त्यात येणा–या अडीअडचणी या संदर्भात प्रश्नोत्तराचे स्वरूपात सविस्तर मार्गदर्शन आदिवासी बांधवाना करण्यात आले.या मेळाव्यास नायब तहसीलदार संजय मांडे, श्री. सुर्यवंशी, श्री.नाईक, श्री.कांबळे व तहसील कार्यालयातील कर्मचारी यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित होते.

सदर मेळाव्यात आदिवासी समाजाकरीता शासनाकडून दिल्या जाणा–या विविध योजनाची माहिती पनवेलचे तहसीलदार विजय तळेकर यांनी दिली.

महसूल विभागाकडून विशेषत: दिल्या जाणा–या योजनांमध्ये प्रामुख्याने रेशन कार्ड, संजयगांधी निराधार योजनेखाली पात्र व्यक्तींना देण्यात येत असलेला आर्थिक लाभ, केंद्र शासनाकडील राष्ट्रीय कुटुंब आर्थिक लाभ, आधारकार्ड, निवडणूक ओळखपत्र, आदिवासी समाज अशिक्षीत असल्याने जातीचे प्रमाणपत्र देताना येणाऱ्या अडचणीबाबत विशेष मार्गदर्शन करून, ज्या आदिवासी बांधवाकडे जातीचा पुराव नसेल त्याठिकाणी समाजाच्या रूढी, परंपरा याबाबत प्रत्यक्ष मंडळ अधिकारी व आदिवासी प्रकल्प निरीक्षक यांचा प्रत्यक्ष स्थळपहाणी अहवाल विचारात घेवून सदर जातीचे प्रमाणपत्र देण्यासाठी मा. उपविभागीय अधिकारी पनवेल यांचेकडे शिफारसी करून देण्याचे आश्वासन यावेळी देण्यात आले.

आदिवासी समाजाला देण्यात येणारी पिवळी रेशन कार्डबाबत आवश्यक तात्काळ चौकशी करून देण्यात येतील, तसेच सदर रेशनकार्ड अन्नसुरक्षा योजनेतील धान्य त्वरीत मिळण्यासाठी संगणकीय प्रणालीत समाविष्ट केली जातील. तसेच अन्नसुरक्षा योजना व मा. पंतप्रधान गरीब कल्याण योजनेतर्गत दिले जाणारे मोफत धान्य आदिवासी भागात धान्य दुकानदार देत आहेत किंवा कसे याबाबतही जाणून घेवून नोव्हेंबर २०२१ पर्यंत अन्नसुरक्षा योजना व मा. पंतप्रधान गरीब कल्याण योजनेतर्गत मोफत धान्य दिले जाईल यांची आठवण यावेळी करून दिली.

प्रेरणा चॅरीटेबल ट्रस्ट रीस रसायनीच्या अध्यक्षा सुशिला मेरी व संस्थेच्या श्रीम. केशर पाटील यांनी आदिवासी समाजाला देण्यात येत असलेल्या आधारकार्ड, रेशन कार्ड, जातीचे प्रमाणपत्र व उत्पन्नाचे दाखल्याबाबत ग्रामपंचायत चावणे येथे सयुक्तपणे कॅम्पचे आयोजन करण्याची विनंती करण्यात आली. शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेताना आदिवासी बांधव व भगिनींना येणा–या अडचणीबाबत तहसीलदार विजय तळेकर यांनी विचारणा करून त्याबाबत आदिवासी बांधवांच्या शंकाचे निरसनही करण्यात आले. तसेच चावणे ग्रामपंचायतीमध्ये कॅम्पचे आयोजन करण्याचे आश्वासन देण्यात आले.

मेळाव्याच्या शेवटी प्रेरणा चॅरीटेबल ट्रस्ट रीस रसायनीच्या अध्यक्षा सुशिला मेरी व संस्थेच्या श्रीम. केशर पाटील यांनी पनवेलचे तहसीलदार विजय तळेकर यांनी आदिवासी बांधवांशी प्रत्यक्ष संवाद साधून शासनाच्या विविध योजनांची माहिती दिल्याने आभार मानून मेळाव्याची सांगता करण्यात आली.

# महिला किसान दिनानिमित्त महिला किसान मेळावा संपन्न

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

अलिबाग येथे महिला किसान दिनानिमित्त कृषी मूल्यवर्धन आणि विपणन साखळी व्यवस्थापन यामध्ये उत्कृष्ठ काम करणाऱ्या महिलांचे जिल्ह्यातील इतर महिलांना मार्गदर्शन होण्यासाठी आज (दि.२२ ऑक्टोबर) रोजी जिल्हास्तरीय महिला किसान मेळावा आयोजित करण्यात आला होता.



यावेळी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी श्रीमती उज्वला बाणखेले, सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय डॉ.सुरेश भारती, महिला आर्थिक विकास महामंडळाच्या जिल्हा समन्वयक श्रीमती वर्षा पाटील, आंबा प्रक्रिया उद्योजक डॉ. मकरंद आठवले, प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग उन्नयन योजनेचे जिल्हा संसाधन अधिकारी श्री. राहुल जोशी, भात प्रक्रिया उद्योजक प्रमिला गावडे, गहू–तांदूळ प्रक्रिया उद्योजक शिल्पा भोसले, मत्स्य पालन व्यवसाय व्यावसायिक पूनम भोईर, प्रकल्प उपसंचालक (आत्मा) श्री. बोराडे, कृषी उपसंचालक श्री. काळभोर, उपविभागीय कृषी अधिकारी श्री. वानखेडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमामध्ये प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग उन्नयन योजनेच्या पोस्टरचे प्रकाशन करण्यात आले. तसेच उपस्थित महिला शेतकऱ्यांना कृषी, मत्स्यव्यवसाय, महिला आर्थिक विकास महामंडळ या विभागाकडील विविध योजनांबद्दल तसेच आंबा, काजू, कोकम, औषधी वनस्पती, भात, नाचणी, दूध, मासे इत्यादी प्रक्रिया उद्योगांबद्दल मार्गदर्शन करण्यात आले.

## रिपब्लिकन चळवळीचे समाधान नावकर यांचे दु:खद निधन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रिपब्लिकन चळवळीचे खंदे समर्थक समाधान नावकर यांचे आज दुःखद निधन झाले आहे.

गेल्या अनेक वर्षापासून त्यांनी पँथर/ रिपब्लिकन चळवळीत सहभाग घेतला होता. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून त्यांनी कामकाज पाहिले होते. अनेक लढ्यात, चळवळीत त्यांनी सक्रीय सहभाग घेतला होता. आज त्यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाल्याने समाज बांधवांसह, कुटुंबिय, नातेवाईक व मित्र परिवाराने दुःखद व्यक्त केले आहे.

## अनोळखी इसमाचा आढळला मृतदेह

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शहरातील शरयु होंडा शोरुम समोरील महामार्गाच्या ब्रिजच्या खाली एका इसमाचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत.

सदर इसमाचे अंदाजे वय ४० ते ४५ वर्षे, उंची ५ फूट, रंग सावळा, चेहरा गोल, केस साधारण वाढलेले काळे पांढरे, दाढी तुरळक, अंगाने मजबूत असून अंगात गुलाबी रंगाचा पांढरे उभे पट्टे असलेला फुल बाह्याचा शर्ट व काळ्या रंगाची हाफ पॅन्ट व त्यावर कमरेला शिलाईपासून मांडीपर्यंत पांढऱ्या रंगाचा पट्टा आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे दूरध्वनी २७४५२३३३ किंवा पो. ना.युवराज म्हात्रे यांच्याशी संपर्क साधावा.

# विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कार्यात पास्को कंपनी सातत्याने अग्रेसर राहील : एमडी सांगहुली

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

ग्रामीण विद्यार्थी वर्गाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी आणि प्रगतशील होण्यासाठी शाळेत शिक्षक देत असलेले ज्ञानदान हे शाळेच्या सुसज्ज इमारतीमध्ये ग्रहण करता यावा यासाठी पास्को कंपनी आवश्यक त्या शैक्षणिक सेवा सुविधा उपलब्ध करून देण्यात अग्रेसर राहील असे पास्को कंपनीचे एमडी सांगहुली यांनी दिघी येथील राजीप प्राथमिक शाळा वर्ग खोल्यांचे लोकार्पण सोहळा कार्यक्रमात मनोगत व्यक्त करताना सांगितले.

निसर्ग चक्री वादळात दिघी येथील शाळा इमारतीची पडझड झाली होती ती दुरुस्ती करण्यासाठी आणि भौतिक साधनासहित तंत्रज्ञांनाच्या कार्यक्षेत्रात विद्यार्थ्याने आवडीने व रुचिने ज्ञान ग्रहण करण्यासाठी पास्को कंपनीने ८,३२,४०० लक्ष रुपये मंजूर केले होते त्या निधीतून बांधलेल्या सुसज्ज शाळा गृहांचे उदघाटन करताना मनस्वी आनंद होत असल्याचे पास्को कंपनी व्यवस्थापक मंडळीने सांगितले.नव्याने उभ्या केलेल्या शाळा इमारतीत नवनवीन तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी कंपनीचे अतिरिक्त पाच लाख रुपयांची निधी जाहीर केला आहे.पास्को कंपनी शाळेच्या उज्वल विकासासाठी याही पुढे कटिबद्ध राहील असे सांगितले.रा.जि.प.शाळा दिघी मराठी शाळेच्या नुतनीकरण केलेल्या तीन वर्गखोल्यांचा लोकार्पण सोहळा कंपनीचे एमडी सांग हूली यांच्या हस्ते संपन्न झाला. कंपनीचे मॅनेजर सुधीर भोसले, डेप्युटी मॅनेजर कुमार महाडिक, दिघी सरपंच विपुल गोरिवले, उपसरपंच गोपाळ मेंदाडकर, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष गोविंद गुणाजी, उपाध्यक्ष लक्ष्मण मेंदाडकर, विस्तार अधिकारी धामणकर, गाव पाटील रोहिदास पाटील, कोळी समाज अध्यक्ष किरण कांदेकर, बौद्ध समाज अध्यक्ष राजेश कासारे, मुख्याध्यापक गोविंद चिकाटी, सदस्य अनंत मेंदाडकर, जनार्दन गोवारी, जयदास अंबाजी, ग्रा.पं.सदस्या श्रीमती कांदेकर, श्रीमती कदम आदी मान्यवर उपस्थित होते.


श्री.भाकरे सो.कोर्ट

प्रो.जमा. ६–२५ अर्जदाराचे वकील : ॲड.सचिन पुंडलिक केणी

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.सिव्हील जज्ज सि.डी./ज्यु.डी.यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१४३८/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२०/१२/२०२१

१) श्रीमती.लक्ष्मी शंकर म्हात्रे
वय : ६१ वर्षे, धंदा : शेती
२) कै.राजू शंकर म्हात्रे मयत तर्फे वारस
२/१) श्रीमती.प्रमिला राजू म्हात्रे
वय : ३९ वर्षे, धंदा : घरकाम
२/२ व २/३ तर्फे अज्ञान पालनकर्ता म्हणून
श्रीमती.प्रमिला राजू म्हात्रे
२/२) कु.साक्षी राजू म्हात्रे
वय : १५ वर्षे, धंदा : शिक्षण
२/३) कु.संजना राजू म्हात्रे
वय : १३ वर्षे, धंदा : शिक्षण
२/४) कु.सिद्धी राजू म्हात्रे
वय : १८ वर्षे, धंदा : शिक्षण
३) श्री.संतोष शंकर म्हात्रे
वय : ४८ वर्षे, धंदा : शेती
वरील सर्व रा.काळुंद्रे, ता.पनवेल, जि.रायगड
४) सौ.इंदुमती रमाकांत पाटील
वय : ५० वर्षे, धंदा : घरकाम
रा.सायन टॉम्बे रोड, गणेश मंदिराजवळ,
टॉम्बे पायलीपाडा मुंबई ४०००८८
५) सौ.अंजनी प्रदीप देव
वय : ४३ वर्षे, धंदा : घरकाम
रा.नागेश्वर सों प्लॉट क्र.६०, आशिर्वाद बंगलो,
डी.एन.सी.शाळेच्या मागे, डोंबिवली पूर्व,
कल्याण, टिळक नगर, ठाणे — अर्जदार

ज्याअर्थी कै.शंकर देहू म्हात्रे हे दि.११/१२/२०१३ रोजी मौजे : काळुंद्रे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मृत्यू पावले असून त्यांचे नावे खालील वर्णनाची मिळकत आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : काळुंद्रे, ता.पनवेल, जि.रायगड**

| गाव | भूखंड क्र. | क्षेत्र हे.आर.पॉ. | दर प्रति चौ.मी. |
|---|---|---|---|
| काळुंद्रे | १७१ | ५०० चौ.मी. | १६.२० |

कै.शंकर देहू म्हात्रे यांचे मृत्यूपश्चात त्यांस अर्जदार हे वारस आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, अर्जदार यांनी सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहे. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज तारीख २२/१०/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल



मा.गोडसे मॅडम

प्रो.जमा. रु.५०/– अर्जदारतर्फे वकील : ॲड.श्री.मनोज म्हात्रे
ॲड.ज्योती सरोदे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश साहेब, वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१४५९/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१०/१२/२०२१

१) श्रीम.मंजुषा राजीव कदम
वय : ४८ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.नील पार्क बिल्डींग, फ्लॅट नं.१०१, सी–२ विंग,
प्लॉट नं.९४, ३, ४, ५, ६, ७ पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
२) वैशाली राजीव कदम विवाहा नंतरचे नाव
सौ.वैशाली युवराज जाधव
वय : ३३ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.लोटस, फ्लॅट नं.७०२, प्लॉट नं.८३,
सेक्टर २ ए, करंजाडे, ता.पनवेल, जि.रायगड
३) सागर राजीव कदम
वय : ३१ वर्षे, धंदा : शेती
रा.नील पार्क बिल्डींग, फ्लॅट नं.१०१, सी–२ विंग,
प्लॉट नं.९४, ३, ४, ५, ६, ७ पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार क्र.१ हिचे पती आणि अर्जदार क्र.२ व ३ यांचे वडील कै.राजीव विठ्ठल कदम यांचा मृत्यू दि.०७/०४/२०२१ रोजी अपोलो हॉस्पिटल इन्टरप्रायझेस लि., प्लॉट नं.१३, सेक्टर २३, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई येथे झालेला असून, कै. राजीव विठ्ठल कदम हे हयात असताना मालकी हक्कात स्वसंपादीत मौजे : कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथे खालील वर्णन केलेली निवासी सदनिका ही मिळकत अर्जदार क्र.१ व कै.राजीव विठ्ठल कदम यांच्या एकत्रित व संयुक्त नावाने आहे. त्या निवासी सदनिकेचे सविस्तर वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**निवासी सदनिकेचे वर्णन**
**मौजे : कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथील पनवेल महानगरपालिका हद्दीतील**

| बिल्डींगचे नाव | सेक्टर नं. | प्लॉट नं. | सदनिका क्रमांक | मजला | विंग | सदनिकेचे क्षेत्र चौ.मी. | मोबदल्याचे बाजार मुल्य |
|---|---|---|---|---|---|---|---|
| श्रीराम आर्केड | २० कामोठे | ३०, ३१, ३२ | १२०३ | बारावा | बी | २.८७ चौ.मी. कारपेट + १0.0३ चौ.मी. डीबी/ एफ बी | ३५,००,०००/– (रु.पस्तीस लाख मात्र) |

वरील निवासी सदनिके संदर्भात अर्जदार यांना वारस दाखला मिळणेकरिता या मे.न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदार यांना वारस दाखला देण्याबाबत कुणाची कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास सदरची ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत न्यायालयात योग्य त्या कागदपत्रकासह सादर करावी. मुदतीत हरकत न आल्यास अर्जदारांकडून कायदेशीर साक्षी पुरावे नोंदवून अर्जदार यांना वारस दाखला प्रदान करण्यात येईल याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

आज दि.२१/१०/२०२१ रोजी कोर्टाच्या सही शिक्क्याने दिली.

सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल



### जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल मे.वालराम इंटरप्रायझेस तर्फे भागीदार १) श्री.चिंतन नानजी दामा, २) श्री.हितेश दयाराम दामा, राहणार : ''एम'' गल्ली, ऑफिस नं.१३, ए.पी.एम.सी. मार्केट–II, दाना बंदर, वाशी, नवी मुंबई–४००७०३ यांनी १) श्री.आत्माराम चाहू भोईर, २) श्री.रघुनाथ चाहू भोईर, ३) श्रीमती.चंद्रभागा सुधाकर उर्फ सुदाम भोईर, ४) श्रीमती.जयश्री हनुमान वास्कर, ५) श्रीमती. शुभांगी शशिकांत ठाकूर, ६) श्रीमती.रुक्मिणी विकास तांडेल, ७) श्रीमती. सुवर्णा विकास नाईक, ८) श्रीमती.बेबी सचिन वास्कर, ९) श्री.नकुल चाहू भोईर, १०) श्रीमती.मंदा गोकुळ भोईर, ११) श्री.मयुरेश गोकुळ भोईर, १२) श्रीमती.मयुरी गोकुळ भोईर उर्फ मयुरी बाळकृष्ण पाटील, १३) श्रीमती.मनाली गोकुळ भोईर, १४) श्रीमती.इंदुबाई चाहू भोईर उर्फ बेबीबाई राजेश डाऊर, १५) श्रीमती.राधाबाई रामचंद्र पाटील उर्फ राधाबाई रामचंद्र घोरपडे, १६) श्री.दत्ता रामा पाटील, १७) श्री.रमेश रामा पाटील, १८) श्रीमती.लक्ष्मीबाई विश्वनाथ ठाकूर उर्फ लीना विश्वनाथ ठाकूर, १९) श्रीमती.शिमगीबाई बाबु भोईर उर्फ शिमगुबाई बाबु भोईर, २०) श्रीमती.रुक्मिणी धर्मराज शेळके उर्फ रुक्मिणी धर्मा शेळके, २१) श्री.तुकाराम गोमा भोईर, २२) श्री.सखाराम हरी भोईर, २३) श्री.राम हरी भोईर, २४) श्रीमती.बेबी नारायण पाटील, २५) श्रीमती.सुभद्रा मणिलाल गावंड, २६) श्रीमती.जयश्री गजानन पाटील, २७) श्रीमती.करुणा श्याम भोईर, २८) श्रीमती.प्रमिला रवींद्र वास्कर, २९) श्रीमती.सुषमा चांगदेव पाटील, ३०) श्री.संदीप श्याम भोईर, ३१) श्री.सुधीर श्याम भोईर सर्व रा.कुंडेवहाळ, ता.पनवेल, जि.रायगड यांच्याकडून त्यांच्या मालकीच्या जमिनीच्या सिडको नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या प्रकल्पांच्या संपादनापोटी २२.५ टक्के योजनेप्रमाणे खालील मिळालेला भूखंड आमचे अशिल हे सिडको त्रिपक्षीय करारान्वये हस्तांतरीत करून घेणार आहेत. सदरहू भूखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**भूखंडाचे वर्णन**
**पुष्पकनगर (दापोली), ता.पनवेल, जि.रायगड**

| नोड | सेक्टर नं. | प्लॉट नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| पुष्पकनगर (दापोली) | ३ | ४६१ | २९० चौ.मी. |

तरी वरील वर्णन केलेल्या मिळकतीसंबंधी कोणा व्यक्ती, इसम, कंपनी यांची कोणचाही दान, गहाण, तारण, लिन, चार्ज, अगर खरेदी अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध, बोजा व हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी ती कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसात आम्हाला आमचे खालील पत्यावर समक्ष येवून भेटून त्याबाबत मुळ कागदपत्रानिशी वरील नमूद केलेल्या पत्यावर लेखी हरकत नोंदवून तशी लेखी पोहोच घ्यावी.

उपरोक्त १५ दिवसांत जर कोणाकडूनही कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत खालील पत्यावर न मिळाल्यास आमचे अशिल सदर मिळकत पूर्णपणे निर्वेध, निजोखमी आहे असे समजून खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर मागाहून कुणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

कळावे,

अशिलातर्फे वकील
ॲड.रेखा होवाळे
प्रभात सेंटर, शॉप नं.१३,
सीबीडी बेलापूर



### जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील नमूद केलेली मिळकत ही श्री.केशव गोमा पाटील वगैरे २ यांचे नावे महसूल दप्तरी ७/१२ चे कब्जेदार सदरी आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : तळोजे मजकूर, ता.पनवेल, जि.रायगड**

| मालक/कब्जेदाराचे नांव | सर्व्हे नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| केशव गोमा पाटील निकळंठ गोमा पाटील | ३४/६ | ०–४५–९० | ८–३८ |

मौजे : तळोजे मजकूर, ता.पनवेल, जि.रायगड येथील वर नमूद मिळकतीचे जमीन मालक ७/१२ मधील नमूद कब्जेदार श्री.केशव गोमा पाटील वगैरे २ यांची वरील नमूद केलेली शेतजमीन मिळकत आमचे अशिलांनी कायमस्वरुपी नोंदणीकृत खरेदीखताचे अनुषंगाने विकत घेण्याचे ठरविले आहे.

सदर नमूद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा कब्जा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ९ दिवसांच्या आत प्रत्यक्ष अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावेत. याप्रमाणे मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल वर नमूद केलेले जमीन मालक/कब्जेदार यांचे बरोबर ठरविलेली कायम खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दि.२३/१०/२०२१**

सही/–
मयुरेश प्र.हनुमंते
ॲडव्होकेट–हायकोर्ट
शॉप नं.बी/१०१, योगेश्वर कृपा बिल्डींग,
ठाणा नाका, रोड, ता.पनवेल, जि.रायगड
मो.नं.८२८६१२१३३३



### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : पुष्पक नोड पारगाव, ता.पनवेल, जि.रायगड येथे श्री.बाळकृष्ण बारकू भोईर व श्री.रामभाऊ नारायण नाईक दोघेही रा.कोल्ही कोपर, ता.पनवेल, जि.रायगड यांचे नावे असलेली जमीन महाराष्ट्र शासनाने नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी संपादीत केलेली आहे. संपादीत मिळकतीच्या मोबदल्यात सिडको महामंडळाने २२.५ टक्के योजनेंतर्गत खालील वर्णन केलेला भूखंड श्री.बाळकृष्ण बारकू भोईर व श्री.रामभाऊ नारायण नाईक यांचे नावे वितरित / अलॉट केलेला असून सदरहू भूखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**भूखंडाचे वर्णन**
**मौजे : पुष्पक नगर (पारगाव), ता.पनवेल, जि.रायगड**

| मौजे | सेक्टर नं. | भूखंड नं. | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|
| पुष्पक नगर (पारगाव) | ७ | २४ | २६२० |

सदरचा भूखंड आमचे अशिल श्री.संदीप श्यामा पाटील व श्री.धीरज चावळा हे समझोता कराराने विकत घेणार आहेत. तरी सदरहू भूखंड / भूखंडामधील कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे मालकी व अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री, पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर भूखंडा निर्वेध व बोजाविरहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर भूखंडासंबंधी समझोता करार, विक्रीचे करार व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रार, दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २३/१०/२०२१

सही/–
ॲड.श्री.विजय गणेश गडगे
अे १/१०१, अंबिका पार्क को.ऑप.
हौ.सो.लि., प्लॉट नं.१, सेक्टर ६,
श्री कृपा हॉल समोर, खांदा कॉलनी,
पनवेल–४१०२०६
मो.नं.७०४५८७३१६१

# संक्षिप्त...

## उरण येथे मधुमेहींसाठी मोफत आरोग्य शिबीर

**दै.रायगड नगरी । उरण**

हयातूल इस्लाम गरीब नवाज चॅरिटेबल ट्रस्ट उरण यांच्या माध्यमातून द ब्रदरहूड मेडिकल ऐड ऍण्ड वेलफेअर फॉउंडेशन यांच्या सहकार्याने उरण मधील मस्जिद मोहल्ला, उरण शहर येथे मधुमेही रुग्णांसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी या शिबिरा अंतर्गत मधुमेही (डायबेटीस ) रुग्णांचे एच बी ए १ सी लिव्हर प्रोफाइल, एलक्ट्रॅलयटीस, युरीनालायसिस, सी क्रीटीव्ह, इन्फेकशन पॅनल आदी तपासण्या मोफत करण्यात आल्या.

खास मधुमेही रोगांसाठी या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.१०० हुन अधिक नागरिकांनी याचा लाभ घेतला. यावेळी हयातूल इस्लाम गरीब नवाज चॅरिटेबल ट्रस्ट उरणचे हाफिज फहद, हाफिज अर्शद, शानू मुकादम, नईम करवेकर, इरफान शेख, गुलजार भाटकर तर द ब्रदरहूड मेडिकल ऐड ऍण्ड वेलफेअर फॉउंडेशनचे इम्रान गुजराथी, अब्दुल पठाण, हरून गिरनारी आदी पदाधिकारी सदस्यांनी आरोग्य शिबीर यशस्वी करण्यासाठी विशेष मेहनत घेतली. यावेळी उरण सामाजिक संस्थेचे उपाध्यक्ष प्राध्यापक राजेंद्र मढवी,सरचिटणीस संतोष पवार, सामाजिक कार्यकर्ते आयाझ फकिह यांनी भेट दिली. सदर आरोग्य शिबिराचा नागरिकांनी मोठ्या प्रमाणात लाभ घेतला.

## तळोजा पोलीस करीत आहेत अपघातग्रस्त वाहनाचा शोध

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल जवळील तळोजा येथील मुंब्रा-पनवेल रोडवर तळोजा गाव पापडीचा पाडा गावासमोर झालेल्या अपघ-ातात एका इसमाचा मृत्यू झाला असून सदर मृत्यूप्रकरणी कारणीभूत असलेल्या अपघातग्रस्त वाहनाचा शोध तळोजा पोलीस करीत आहेत.

सदर अपघातात गणेश दाजी जाधव (३० रा.तळोजा) यांना एका अज्ञात वाहनाने ठोकर दिल्याने त्यांचा भोला अस्लम पठाण यांच्या दुकानासमोर अपघातात मृत्यू झाला आहे. सदर अपघात झााला त्यावेळी कोणीही अपघात पाहिला असेल किंवा ज्या वाहनाने अपघात केला त्या वा-हनाचा प्रकार, वाहनाचा नंबर किंवा इतर माहिती कोणाकडे असल्यास त्यांनी तळोजा पोलीस ठाणे दूरध्वनी ०२२-२७४१२३३३, ९६६४५९९१९१ किंवा पो.उपनिरीक्षक विजय यादव यांच्याशी संपर्क साधावा.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# जिल्हा परिषद निवडणुकींच्या पूर्वतयारीसाठी भाजपचा मेळावा

## भाजपच्या अनेक योजना सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहचविण्याचे आवाहन

**दै.रायगड नगरी । नेरळ**

भारतीय जनता पार्टीच्या वतीने बुथ अध्यक्ष आणि शक्तीकेंद्र प्रमुख यांच्या मेळाव्याचे आयोजन शुक्रवार दि. २२ ऑक्टोंबर रोजी कर्जत साईकृपा शेळके मंगल कार्यालय किरवली येथे करण्यात आले होते. यावेळी कर्जत तालुक्यातील २०० बुथ अध्यक्ष आणि ५० शक्तीकेंद्र प्रमुख यांच्यासह कर्जत तालुक्याती तसेचे रायगड जिल्हयातील अनेक पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.



यावेळी रायगड जिल्हयाचे माजी पालकमंत्री, भाजपा महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस आमदार रविंद्रजी चव्हाण हे उपस्थित होते. त्यांनी कार्यकर्त्यांना मागदर्शन केले. यावेळी ते बोलताना म्हणाले, आगामी नगरपालिका आणि जिल्हा परिषद निवडणुका शत प्रतिशत भाजपा हा मंत्र घेवून आपण जनतेसमोर जावू अणि भारतीय जनता पक्षाचे जास्तीत जास्त सदस्य जिल्हा परिषदेत आणि पंचायत समितीमध्ये पाठवू असा विश्वास यावेळी त्यांनी व्यक्त केला.

यावेळी कोकण पदवीधर मतदार संघाचे आमदार निरंजन डावखरे यांनी सांगितले की, मा. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वातील सरकारने सर्व सामान्य माणसाचा विचार करून अनेक योजना दिल्या आहेत. कोरोना काळात दिली जाणारी मोफत लस असो की, गरीब कल्याण योजनेअंतर्गत सर्व सामान्य जनतेला धान्य वाटप असो किंवा प्रधानमंत्री आवास योजनेतून गोरगरिबांना घरे देणे, शेतकर्यांना दिलासा देणारी किसान सन्मान योजनेअंतर्गत शेतकर्यांना २००० च्या ३ हप्त्यात ६००० रूपये रक्कम डीबीटीच्या माध्यमातून दिली.

महिला भगिनींना उज्वल गॅस योजनेअंतर्गत मोफत गॅस कनेक्शन, मुद्रा योजनेमधून होतकरू तरूणांना व्यावसायासाठी कर्ज उपलब्ध करून दिले. या अनेक योजना राबविल्या गेल्या. या सर्व योजना घेवून भाजपा कार्यकर्त्यांनी सर्वसामान्य नागरिकांपर्यंत गेले पाहिजे. त्यांनी त्याचा लाभ मिळवून दिला पाहिजे. या मेळाव्यात भारतीय जनता पक्ष कर्जत तुक्यात मोठया प्रमाणात घोडदैड करीत असल्याचे प्रतिपादन यावेळी निरंजन डावखरे यांनी केले. यावेळी कर्जत तालुकाध्यक्ष मंगेश म्हसकर, जिल्हा सरचिणीस दिपक बेहरे, पनवेल महानगरपलिकेचे नगगरसेवक प्रकाश बिनेदार, जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, जिल्हा चिटणीस रमेश मुंढे, जिल्हा सरचिटणीस अविनाश कोळी, नितीन कांदळगावकर, सुनिल गोगटे, सरचिटणीस राजेश भगत, संजय कराळे, बिनीता घुमरे, संतोश भोईर, प्रमोद पाटील, नगरसेवक बळवंत घुमरे, उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल, माथेरान उपनगराध्यक्ष आकाश चौधरी, माथेरान अध्यक्ष प्रविण सकपाळ, नेरळ महिला शहराध्यक्ष नम्रता कांदळगावकर, कर्जत तालुका महिला मोर्चा अध्यख स्नेहल गोगटे, मृणाल खेडेकर, केशव तरे, रोशन पाटील,राहूल कुलकर्णी, श्रध्दा कराळे, सुप्रिया भगत, राजन लोभी, संतोष शिंगाडे, सरीता पादीर, राहून कुलकर्णी, नगगसेविका स्वामीनी मांजरे आदी यावेळी उपस्थित होते.

### फ्लॅट विकत देण्याचे अमिष दाखवून...

## ग्राहकांकडून लाखो रुपये उकळणाऱ्या बांधकाम व्यावसायिकावर गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल मधील विचुंबे भागात इमारतीचे बांधकाम करणाऱ्या एका बांधकाम व्यावसायीकाने सदर इमारतीतील फ्लॅट विकत देण्याचे अमिष दाखवुन ९ ग्राहकांकडून सुमारे ७४ लाखांची रक्कम उकळून त्यांना मागील पाच वर्षामध्ये फ्लॅट न देता त्यांची फसवणुक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. सुमीत सदास मोरे असे या बांधकाम व्यावसायीकाचे नाव असुन खांदेश्वर पोलिसांनी त्याच्या विरोधात फसवणुकिसह मोफा कायद्यानुसार गुन्हा दाखल करुन त्यांचा शोध सुरु केला आहे. विशेष म्हणजे या बांधकाम व्यावसायिकाने यातील अनेक फ्लॅट दोन-दोन ग्राहकांना विकल्याचे देखील आढळुन आले आहे.

या प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आलेल्या सुमीत सुदास मोरे हा मे.एम.एस. प्रियदर्शी इंटरप्रायजेसचा प्रोप्रायटर असून त्याने२०१२-१३ मध्ये पनवेलच्या विचुंबे भागात इमारत बांधकामासाठी घेतले होते. त्यावेळी मोरे याने सदर इमारतीतीचे बांधकाम २ वर्षात पुर्ण करुन फ्लॅटचा ताबा देण्याचे आश्वासन ग्राहकांना दिले होते. त्याच्या अमिषाला भुलून अनेक ग्राहकांनी त्याच्या इमारत बांधकाम प्रकल्पातील फ्लॅटची बुकिंग केली होती. तसेच अनेक ग्राहकांनी लाखो रुपये दिले होते. मात्र त्यानंतर मोरे यांने त्यानंतर इमारतीचे बांधकाम अद्यापर्यंत पुर्ण केले नाही.

त्यामुळे लाखो रुपये देऊन फ्लॅटची बुकिंग करणाऱ्या ग्राहकांनी त्याच्याकडे आपले पैसे परत मागण्यास सुरुवात केली असता, मोरे याने ग्राहकांना पैसे देण्यास टाळाटाळ केली. अखेर काही ग्राहकांनी खांदेश्वर पोलीसांकडे याबाबत तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवरून पोलिसांनी सुमीत सदास मोरे याच्या विरोधात फसवणुकीसह महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिका (बांधकाम, विक्री, व्यवस्थापन आणि हस्तांतरण नियमन) अधिनियम १९६३ प्रमाणे गुन्हा दाखल करुन त्याचा शोध सुरु केला आहे.

या प्रकरणात फसवणुक झालेल्या ९ ग्राहकांनी पोलिसांकडे तक्रार केली असून या प्रकरणात आणखी काही ग्राहकांची फसवणुक झाली असण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. या प्रकरणातील आरोपी सुमीत सदास मोरे याने अनेक फ्लॅट हे दोन दोन ग्राहकांना विकून त्यांच्याकडून लाखो रुपये घेतल्याचे देखील उघडकिस आले आहे.

## लसीकरणाचा १०० कोटींचा टप्पा पुर्ण; पालिका प्रशासन आरोग्य सेवकांमध्ये आनंदाचे वातावरण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मागील अडीच वर्षात कोरोनाने थैमान घातला.सर्वसामान्यांमध्ये याबाबत प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले असताना .लसींचा शोध लागल्यावर लस मिळविण्यासाठी सर्वांची चढाओढ सुरु झाली.सुरुवातील लसीकरणाबत काही प्रमाणात गोंधळ निर्माण झालेला असताना काही कालांतराने लसीकरण मोहिमेने वेग पकडला.पनवेल महानगरपालिका क्षेत्रात आज मोठ्या प्रमाणात लसीकरण झाले आहे.

यामध्ये पूर्वाश्रमीचे आयुक्त सुधाकर देशमुख व विद्यमान आयुक्त गणेश देशमुख यांच्यासह संपूर्ण आरोग्य विभागाचे योगदान मोलाचे आहे. देशभरात दि.२१ रोजी १०० कोटी लसीकरणाचा टप्पा पूर्ण झाल्याने हि आनंदाची बाब आहे.केंद्र सरकार ,राज्य सरकार यांच्या समन्वयाने हि मोहीम स्थानिक स्वराज्य संस्थांनी यशस्वी करून दाखविली आहे.यामध्ये आरोग्य सेवक,डॉक्टर्स ,मुख्य आरोग्य अधिकारी ,आयुक्त यांचे योगदान महत्वाचे आहे.पनवेल महानगरपालिका क्षेत्रात १०० टक्के लसीकरण पूर्ण झाल्याने पालिका आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाने पालिकेने लसीकरणाचा पहिला टप्पा यशस्वीपणे पार पाडला आहे. यावेळी बोलताना मुख्य वैद्यकी अधिकारी डॉ.आनंद गोसावी म्हणाले की, कोविड लसीकरण मोहीम राबविणे खरोखरच जीकरिचे होते.कोविडची निर्माण झालेली भीती त्यानंतर कोविडचे लसीकरण मोहीम राबविताना हे आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांसाठी एक वेगळे असे चॅलेंज होते.त्यास सर्वानी सकारात्मक प्रतिसाद दिला.१०० कोटींच्या लसीकरणात लहानातल्या लहान आरोग्य सेवकाचे योगदान महत्वाचे आहे. तर डॉ.भक्तराज भोईटे यांनी सांगितले की, १०० कोटींचा लसीकरणाचा टप्पा पार पडणारा भारत हा देशातील एकमेव देश आहे.या मोहिमेत आपला सहभाग राहिला आहे. हि आनंदाची बाब आहे. आरोग्य सेविका संगीता काळे यांनी सांगितले की, लसीकरण मोहिमेत प्रत्यक्ष सहभाग घेताना मनात काही प्रमाणात भीती होती.कालांतराने अभिमानाने आम्ही हे कार्य पूर्ण केले.आमच्यासह लाखो आरोग्य सेवकांच्या योगदानानेच व वरिष्ठांच्या सहकार्याने देशभरात १०० कोटी लसीकरणाचा टप्पा पूर्ण झाला आहे.

> देशभरात लसीकरणाचा १०० कोटींचा टप्पा पुर्ण होणे हे अभिमानास्पद आहे.यामध्ये पनवेल महानगरपालिकेचा देखील खारीचा वाटा असल्याने पालिकेतील आरोग्य कर्मचारी,आरोग्य सेविका आदींसह जे घटक या मोहिमेशी जोडले गेले आहेत. मी त्यांचे अभिनंदन करतो.
>
> **: गणेश देशमुख (आयुक्त, पनवेल महानगरपालिका)**

### शरीरास अपायकारक असलेली रसायनयुक्त ताडी विक्री करणाऱ्या

## दोन ताडी दुकानावर अन्न व औषध प्रशासन विभागाची कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

आरोग्यास अपायकारक असलेल्या रसायन मिश्रित ताडीची बेकायदेशीररीत्या विक्री करणाऱ्या पनवेल तालुक्यातील दोन ताडीच्या दुकानावर अन्न व औषध प्रशासनाने गुन्हे दाखल केले आहेत. अन्न व औषध प्रशासन विभागाच्या रायगड-पेण येथील पथकाने नोव्हेंबर २०२० मध्ये पनवेलच्या कोळखे गावातील ताडी-माडी दुकानावर तसेच कळंबोलीतील महेश ताडी माडी केंद्रावर छापा मारला होता. त्यावेळी या दोन्ही दुकानातून ताब्यात घेतलेले ताडीचे नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. या तपासणीत सदर ताडीमध्ये शरीरास अपायकारक असलेला क्लोरेल हायड्रेट हे रसायन असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर या दोन्ही दुकानांवर ही कारवाई करण्यात आली आहे.

पनवेल मधील कोळखे गावातील ताडी माडी दुकानात तसेच कळंबोली सेक्टर-५ मधील महेश ताडी माडी केंद्रावर रसायनयुक्त ताडीची बेकायदेशीररीत्या पी करण्यात येत असल्याची माहिती अन्न व औषध प्रशासन विभागाच्या रायगड-पेण येथील पथकाला मिळाली होती. त्यानुसार नोव्हेंबर २०२० मध्ये अन्न सुरक्षा अधिकारी सचिन आढाव व त्यांच्या पथकाने कोळखे गावातील ताडीच्या दुकानावर छापा मारला होता. त्यावेळी पनवेलच्या कोळखे गाव येथील ताडी विक्रेता नंदकुमार कुरंगळे याने अन्न व औषध प्रशासनाकडून परवाना घेतला नसल्याचे आढळुन आले. त्यामुळे अन्न व औषध प्रशासन विभागाने नोंदणी प्रमाणपत्र घेईपर्यंत व्यवसाय बंद करण्याचे आदेश दिले होते.

तसेच सदर ताडीच्या दुकानातून ताडीचे नमुने तपासणीसाठी घेतले होते. त्यानंतर अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने कळंबोलीतील महेश ताडी माडी केंद्रावर छापा मारुन त्याची तपासणी केली होती. सदर ताडी माडी केंद्राचा परवाना असल्याचे आढळुन आल्यानंतर अन्न व औषध प्रशासन विभागाने त्या दुकानातून ताडीचे नमुने तपासणीसाठी ताब्यात घेतले होते. त्यानंतर या दोन्ही दुकानातील ताडीचे नमुने पुणे येथील अन्न व औषध प्रशासन विभागाच्या अन्न विश्लेषक विभागाकडे विश्लेषणासाठी पाठविले होते. अन्न विश्लेषक विभागाने दिलेल्या तपासणी अहवालात सदर ताडीमध्ये अल्कोहोलचे प्रमाण अधिक असल्याचे त्यात क्लोरेल हायड्रेट हे घातक रसायन असल्याचे व ते पिण्यासाठी असुरक्षीत असल्याचे आढळुन आले होते. त्यानंतर सदर ताडीचे नमुने फेर विश्लेषणासाठी मैसुर येथील रेफरल फुड लॅबोरेटरी येथे पाठविण्यात आले होते.

या तपासणीत देखील सदरच्या ताडीत क्लोरेल हायड्रेट व अल्कोहोल असल्याचे व ते मानवी आरोग्यास अपयकारक असल्याचे अहवालात आढळुन आले. त्यानंतर अन्न व औषध प्रशासनाने पनवेलच्या कोळखे गाव येथील ताडी विक्रेता नंदकुमार कुरंगळे याच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात तर कळंबोली येथील ताडी पोता सागर बोडीगे व प्रकाश बंगेरा या दोघांविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियमानुसार गुन्हा दाखल केला आहे. या ताडी विक्रेत्यांनी रासायनीक ताडी कुठे तयार केली, तसेच या ताडी विक्रेत्यांना क्लोरल हायड्रेट या रसायनाचा पुरवठा कुणी केला. याचा तपास आता पोलीस व अन्न औषध प्रशासनाकडुन करण्यात येत आहे. अन्न औषध प्रशासन विभागाने रसायन मिश्रित ताडीची विक्री करणाऱ्या ताडी विक्रेत्यांवर धडक कारवाई सुरु केल्याने ताडी विक्रेत्यांचे धाबे दणाणले आहेत.

## माथेरानमधील झोपडपट्टी भागातील नागरिकांची स्वच्छतेच्या बाबतीत मानसिकता नाही

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान नगरपरिषदेच्या माध्यमातून नियमितपणे घरोघरी जाऊन महिला कामगार कचरा संकलन करण्याची कामे करत आहेत तर घोड्यांची लीद गोळा करण्यासाठी सुध्दा संबंधित ठेकेदारांची माणसे हातगाडी मधून संकलन करीत असतात परंतु येथील झोपडपट्टी भागा-तील नागरिकांची अद्यापही स्वच्छ्तेच्या बाबतीत मानसिकता तयार झालेली नाही.



विशेषतः काही भागातील महिला वर्ग प्लास्टिक कचरा त्याचप्रमाणे उष्टेअन्न ( खरकटे ) हे आजूबाजूला असलेल्या गटारात टाकत असतात.तर घोड्यांची लीद सुध्दा बहुतांश भागातील घोडेवाले हे जवळच्या गटारात अथवा झाडाखाली टाकत आहेत त्यामुळे त्या त्या भागातील झाडे मरण पावली आहेत. पावसाळ्यात हा संपूर्ण कचरा पाण्याच्या प्रवाहाने डोंगरात वाहून जातो परंतु उन्हाळ्यात हा कचरा गटारात साठून रहात आहे त्यामुळे त्या त्या भागातील नागरिकांना तसेच पादचाऱ्यांना दुर्गंधीचा सामना करावा लागतो तर जवळपास असलेल्या लोजिंग मधील पर्यटकांना सुध्दा नाहक हा त्रास सहन करावा लागत आहे. या घाणीच्या साम्राज्याचा परिणाम डासांच्या माध्यमातून नागरिकांना होत असून आजारांना निमंत्रण देण्यासारखे आहे. याच गटारात प्लास्टिक पिशव्या, पाण्याच्या बाटल्या तसेच अन्य कचरा गोळा करण्यासाठी ही सर्व गटारे स्वच्छ करण्यासाठी नगरपरिषदेच्या कायम असलेल्या सफाई कामगारांना गटारात उतरून ही संपूर्ण घाण काढून त्याची योग्य जागी विल्हेवाट लावावी लागते. या कामगारांना स्वतःच्या आरोग्यासाठी नगरपरिषदेच्या माध्यमातून हँडग्लोज त्याचप्रमाणें गंबुट, मास्क देणे बंधनकारक असताना त्याचा या कामगारांना पुरवठा होत नसल्याचे दिसून येत आहे. स्वच्छता अभियाना मध्ये हेच कामगार दिवसरात्र एक करून गावाची स्वच्छता राखत असतात यामुळेच नगरपरिषदेला आजवर अनेक रोख रक्कमेची पारितोषिक प्राप्त झाली आहेत. खऱ्या अर्थाने हे सफाई कामगार स्वच्छता दूत आहेत.

यापुढे नगरपरिषदेच्या माध्यमातून गावातील विविध ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे आवश्यक आहे जेणेकरून ज्या व्यक्ती अस्वच्छता राखत असतील त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करता येऊ शकते.

## सुकेळी येथून मोबाईल चोरीला

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

सुकेळी येथील आशिर्वाद पान शॉप येथून रेलमी सि.२५ हा १००००रु. किंमतीचा मोबाईल चोरट्याने लंपास केला असून चोरट्याचा फोटो कॅमेऱ्या कैद झाला आहे.

सविस्तर वृत्त असे कि बुधवार दि.२० ऑक्टोबर रोजी सुकेळी येथील जिंदल कंपनी समोर असणाऱ्या आशिर्वाद पान शॉप येथून सुनिल कुमार उर्फे दिप कुमार यांचा रेलमी सि.२५ हा १०००० रु. (दहा हजार रु.) किंमतीचा मोबाईल चोरट्याने लंपास केला आहे. त्याचा फोटो कॅमेऱ्यात कैद झाला. हा मुलगा दोन दिवसपूर्वी आशिर्वाद हॉटेल येथे कामाला आला होता. तो आपले कपडे घरुन घेऊन येतो. असे कारण सांगून मोबाईल लंपास करुन गेला. हा मुलगा इंदापूर तळा या भागातील असुन त्याचे नाव मात्र समजू शकले नाही. परंतु फोटो मधील मुलगा जर कोणाला दिसुन आला तर सुकेळी आशिर्वाद पान येथील सुनील कुमार यांच्या संपर्क साधावा असे सांगण्यात येत आहे.

## रायगड जिल्ह्यातील महत्वपूर्ण प्रकल्पाच्या भूसंपादन प्रक्रियेला गती द्यावी : विलास पाटील

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

रायगड जिल्ह्यात सुरु असलेल्या महत्वपूर्ण प्रकल्पांच्या भूसंपादन प्रक्रियेला अधिक गती द्यावी, याकामी येणाऱ्या अडचणी तात्काळ दूर करुन भूसंपादन प्रक्रिया पूर्ण करावी, असे निर्देश कोकण विभागाचे विभागीय आयुक्त विलास पाटील यांनी रायगड जिल्हाधिकारी कार्यालयातील भूसंपादन अधिकाऱ्यांना दिले.

कोकण विभागीय आयुक्त कार्यालयात (दि.२२ऑक्टोबर २०२१) रोजी विभागीय आयुक्त विलास पाटील यांनी रायगड जिल्ह्यातील डीएफसीसीआयएल उरण, मुंबई-गोवा नॅशनल हायवे पनवेल ते इंदापूर व इंदापूर ते झारप, विरार-अलिबाग मल्टीपर्पज कॉरिडॉर, डीएमआयसी, पनवेल-कर्जत रेल्वे लाईनचे दुपदरीकरण या विकास प्रकल्पांबाबतचा आढावा घेतला. यावेळी जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर, अपर जिल्हाधिकारी अमोल यादव, उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) सर्जे राव म्हस्के-पाटील, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) श्रीमती सुषमा सातपुते तसेच रायगड जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी, भूसंपादन अधिकारी, राष्ट्रीय महामार्ग, रेल्वे, डीएफसीसीआयएल प्रकल्पांशी संबंधित अधिकारी उपस्थित होते. रायगड जिल्ह्याच्या विकासाला गती देणारे हे महत्वपूर्ण पायाभूत प्रकल्प असून त्यांच्या कामांना गती मिळण्यासाठी वेळेत भूसंपादन होणे आवश्यक आहे. भूसंपादनाअभावी कोणत्याही प्रकल्पाचे काम रखडू नये, यासाठी संबंधित यंत्रणांनी भूसंपादनात येणाऱ्या अडचणींवर मार्ग काढावा, असेही विभागीय आयुक्त विलास पाटील यांनी यावेळी सांगितले. तसेच हे विकासाभिमुख पायाभूत प्रकल्प असल्यामुळे प्रशासकीय यंत्रणांनी भूसंपादनात येणाऱ्या अडचणींवर मार्ग काढण्यासाठी शेतकऱ्यांशी संवाद वाढविण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. यावेळी पनवेल, उरण, पेण, माणगाव, महाड, अलिबाग येथील उपविभागीय अधिकाऱ्यांनी या प्रकल्पांसाठी त्या-त्या तालुक्यात भूसंपादन झालेल्या कामांचा सविस्तर आढावा सादर केला.